मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 25 जानेवारीला जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव

## विद्यार्थ्यांसाठी महापालिकेचा व आशाकिरण सोशल फाउंडेशन यांचा संयुक्त आरोग्यदायी उपक्रम

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका व आशाकिरण सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १२ वा जागतिक सूर्यनमस्कार महोत्सव रविवार, २५ जानेवारी २०२६ रोजी मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर, चिंचवडगाव येथे आयोजित करण्यात आला आहे.

महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपायुक्त पंकज पाटील, ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांमध्ये योगसाधना, शारीरिक स्वास्थ्य, मानसिक स्थैर्य तसेच शिस्तबद्ध जीवनशैलीचा संस्कार रुजवणे या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात पिंपरी चिंचवड महापालिका शाळेतील व खासगी शाळेतील इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत, तसेच विविध राजकीय क्षेत्रातील मान्यवर व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.



### अशी करता येणार नावनोंदणी...

» या जागतिक सूर्यनमस्कार महोत्सवासाठी नावनोंदणी २२ जानेवारी ते २४ जानेवारी २०२६ या कालावधीत मोरया गोसावी क्रीडांगण, केशवनगर, चिंचवडगाव येथे दररोज सायंकाळी ४.०० ते ६.०० या वेळेत करता येणार आहे. तसेच ९४२२२३१५६९ या व्हॉट्सअॅप मोबाईल क्रमांकावर देखील नावनोंदणी करता येईल. नावनोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २५ जानेवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष मैदानावर केशवनगर येथील मोरया गोसावी क्रीडांगण येथे सकाळी ७.३० वाजता मुख्य सूर्यनमस्कार महोत्सवाला सुरुवात होणार आहे.

# 'बजाज पुणे ग्रँड टूर-2026'चे पिंपरी-चिंचवडकरांकडून जल्लोषात स्वागत

## महापालिका हद्दीतील लक्ष्मी चौक ते आकुर्डी, रावेत रस्त्यावर नागरिकांची दुतर्फा गर्दी

**पिंपरी | प्रतिनिधी**

ढोल-ताशांचा निनाद, टाळ्यांचा गजर आणि उत्साहाची लाट अशा जल्लोषपूर्ण वातावरणात पिंपरी चिंचवडकरांनी 'बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचे जल्लोषात स्वागत केले. वेग, शिस्त आणि खेळभावनेचा संगम असलेली ही स्पर्धा नागरिकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारी ठरली. स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सायकलपटूंचे पिंपरी चिंचवड शहरात आगमन होताच लक्ष्मी चौक ते आकुर्डी या मार्गावर ही स्पर्धा पाहण्यासाठी नागरिकांची हजारोंच्या संख्येने दुतर्फा गर्दी जमली होती. पिंपरी चिंचवड महापालिकेने या स्पर्धेच्या अनुषंगाने जय्यत तयारी करीत शहरातील प्रमुख मार्गांसह तसेच चौकांमध्ये ठिकठिकाणी फुलांची आकर्षक सजावट केली होती.

'बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या पहिल्या टप्प्याला आज प्रचंड उत्साहात सुरुवात झाली. टी.सी. एस. सर्कल, हिंजवडी येथून सुरू झालेल्या या टप्प्याचा समारोप डॉ. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय इन्स्टिट्यूट, आकुर्डी, रावेत येथे झाला.

यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता बापू गायकवाड, उप आयुक्त अण्णा बोदडे, संदीप खोत, डॉ. प्रदीप ठेंगल, क्षेत्रीय अधिकारी अतुल पाटील, राजाराम सरगर, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार यांच्यासह महापालिका तसेच विविध उद्योग समूहांचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक यावेळी उपस्थित होते.



'बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६' या स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यातील एकूण अंतर ९१.८ किलोमीटर होते. या टप्प्याची सुरुवात टी.सी. एस.सर्कल, हिंजवडी येथून झाली. स्पर्धा सुरू असतानाच रस्त्यांवर सायकलपटू वेग आणि क्षमतेचा सुरेख मिलाफ सादर करताना दिसले. काही ठिकाणी तीव्र वळणे, चढ-उतार असल्याने स्पर्धकांसमोर आव्हाने होती. मात्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे सायकलपटू आत्मविश्वासाने ही आव्हाने पेलताना दिसून आले. मार्गावरील ठरावीक ठिकाणी वैद्यकीय मदत, रुग्णवाहिका, तांत्रिक मदत वाहने तसेच रिफ्रेशमेंट पॉइंट्स सज्ज ठेवण्यात आले होते. ड्रोन, सीसीटीव्ही कॅमेरे आणि मोटरसायकल पथकांच्या माध्यमातून सातत्याने स्पर्धा परिसराचे निरीक्षण करण्यात येत होते.

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील लक्ष्मी चौक येथे या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या सायकलपटूंचे आगमन होताच त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. हे सायकलपटू लक्ष्मी चौक–भूमकर चौक–डांगे चौक–श्री संत नामदेव महाराज चौक मार्गे आकुर्डी येथील डॉ. डी. वाय. पाटील आंतरराष्ट्रीय इन्स्टिट्यूट येथे पोहोचले. यावेळी लक्ष्मी चौक ते आकुर्डी या मार्गावर खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा मोठी गर्दी होती. स्पर्धेच्या समारोपस्थळी सायकलपटूंचे पिंपरी चिंचवडकरांनी जल्लोषात स्वागत केले आणि त्यांना प्रोत्साहन दिले. विशेष करून यावेळी तरुणाई मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### पिंपरी चिंचवड महापालिकेचे सूक्ष्म नियोजन

» पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने 'बजाज पुणे ग्रँड टूर – २०२६' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यासाठी व्यापक तयारी करण्यात आली होती. स्पर्धा मार्गाची पाहणी करून वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा, आरोग्य सेवा तसेच आपत्कालीन सुविधांबाबत सूक्ष्म नियोजन करण्यात आले. काही कालावधीसाठी मार्गांवर वाहतूक वळविण्यात येऊन आवश्यक त्या ठिकाणी मार्ग बंद ठेवण्यात आले होते. याशिवाय स्पर्धा मार्गावर चौकाचौकांत उद्यान विभागाच्या वतीने फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती.

# महापालिकेत बारणे, जगतापांचे वर्चस्व!

## नगरसेवकांच्या यादीतून शहराच्या राजकारणातील आडनावांचा प्रभाव पुन्हा स्पष्ट

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीत विजयी झालेल्या उमेदवारांच्या यादीकडे पाहिल्यास शहराच्या राजकारणात आडनावांचे महत्त्व आणि प्रभाव पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे. यंदाच्या निवडणुकीत सर्वाधिक बारणे आडनावाचे सहा उमेदवार विजयी झाले असून, जगताप, काटे आडनावाच्या प्रत्येकी पाच उमेदवारांनी महापालिका सभागृहात प्रवेश केला आहे.




चिंचवडे, कलाटे, शितोळे, भालेकर, कुटे, लांडगे, ढोरे, मोरे, वाघेरे यांसारख्या परिचित आडनावांचेही नगरसेवक सभागृहात दिसणार आहेत. आडनाव म्हणजे व्यक्तीची सामाजिक, कौटुंबिक आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी दर्शवणारे महत्त्वाचे प्रतीक मानले जाते. अनेक आडनावे विशिष्ट गाव, वसाहत, परिसर किंवा व्यवसायाशी निगडित असल्याने त्या-त्या भागात त्यांचा प्रभाव असतो. त्यामुळे निवडणुकांच्या राजकारणात आडनाव हा घटक अनेकदा मतदारांच्या मानसिकतेवर प्रभाव टाकणारा ठरतो, असे राजकीय अभ्यासकांचे मत आहे.

पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणात गावकी-भावकी, गाववाला-बाहेरवाला हा मुद्दा पूर्वीपासून प्रभावी राहिला. यंदाच्या निवडणुकीतही हा मुद्दा आडनावाच्या माध्यमातून प्रकर्षाने पुढे आला. काही प्रभागांमध्ये एकाच आडनावाचे एकाहून अधिक उमेदवार रिंगणात उतरल्याने मतांचे विभाजन झाले, तर काही ठिकाणी परिचित आडनावामुळे उमेदवारांना थेट लाभ झाला. त्यामुळे आडनाव साधर्म्य हा घटक काहींसाठी फायदेशीर, तर काहींसाठी तोट्याचा ठरला. रावेत प्रभागात भोंडवे आडनावाचे मोरेश्वर भोंडवे राष्ट्रवादी काँग्रेसकडून आणि भाजपकडून दीपक भोंडवे हे समोर-समोर लढल्याने भोंडवे आडनावाच्या मतांची विभागणी झाली. त्यामुळे शिवसेना (शिंदे) पक्षाचे नीलेश तरस निवडून आले.

### आडनावानुसार विजयी नगरसेवकांची संख्या

» शहराच्या राजकारणावर प्रभाव असलेल्या बारणे आडनावाचे सर्वाधिक सहा नगरसेवक आहेत. त्याखालोखाल जगताप आडनावाचे पाच, काटे पाच, लांडगे चार, गायकवाड चार, कांबळे तीन, शिंदे तीन आणि कदम आडनावाचे तीन नगरसेवक आहेत.

### महापौरपदी कोणत्या आडनावाची व्यक्ती बसणार?

» महापौरपदाच्या आरक्षणाची सोडत गुरुवारी होणार आहे. आजपर्यंत सर्व प्रवर्गातील आरक्षणे झाले असून केवळ अनुसूचित जातीचे आरक्षण राहिले आहे. त्यामुळे नेमके आरक्षण कोणते पडणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कोणत्या आडनावाचा महापौर होणार याची उत्सुक्ता असणार आहे.

### कोणत्या पक्षाचे किती नगरसेवक

» महापालिका निवडणुकीत भाजपची दुसऱ्यांदा एकहाती सत्ता आली आहे. भाजपने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा पराभव केला. भाजपच्या चारही आमदारांनी यशस्वी रणनिती अवलंबून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर मात केली. भाजपचे सर्वाधिक ८४ आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे केवळ ३७ नगरसेवक निवडून आले. शिवसेना (शिंदे) पक्षाचे सहा आणि एक अपक्ष नगरसेवक निवडून आला आहे.


---

# तळवडे, कळस परिसरातील वीज पुरवठा सक्षमीकरणाला "बुस्टर"

## कॅनबे उपकेंद्र, GREF सेंटर कळस येथे वीज प्रकल्पांना मंजुरी; आमदार लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

**पिंपरी | प्रतिनिधी**

तळवडे व दिघी औद्योगिक परिसरातील वाढत्या वीज मागणीमुळे निर्माण होणाऱ्या वारंवार बिघाड व सक्तीच्या भारनियमनाच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महावितरणकडून महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. औद्योगिक व आय.टी. क्षेत्राच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन 22/22 के.व्ही. कॅनबे उपकेंद्र तसेच 22/11 के.व्ही. GREF सेंटर कळस येथे अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर उभारणीचे DPR प्रस्तावित करण्यात आले आहेत. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी याबाबत केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे.



सध्या तळवडे परिसरातील विद्युत यंत्रणा अतिभारित व संयुक्त स्वरूपाची असल्यामुळे वारंवार ब्रेकडाऊन होत असून प्रमुख औद्योगिक व आय.टी. परिसरांचा वीज पुरवठा खंडित होत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणावर महसूल नुकसान व ग्राहकांमध्ये नाराजी आहे. याबाबत महावितरण संदर्भात विविध प्रलंबित विकास कामांसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाचे संचालक विश्वास पाठक यांच्यासोबत मे-2025 मध्ये महत्त्वपूर्ण बैठक घेण्यात आली होती. तसेच, विधानसभा अधिवेशनामध्ये राज्याचे मुख्यमंत्री तथा उर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांना मागणी केली होती. त्याला प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

तसेच, 22/11 के.व्ही. GREF सेंटर कळस उपकेंद्रातील 10 MVA क्षमतेचा एकमेव ट्रान्सफॉर्मर सध्या जवळपास 95 टक्के भारावर कार्यरत आहे. परिणामी उच्चांक मागणी दरम्यान दिघी व VSNL फीडरवर दररोज 2 ते 3 तास सक्तीचे भारनियमन करावे लागत आहे. ही समस्या कायमची दूर करण्यासाठी GREF सेंटर कळस येथे अतिरिक्त 10 MVA पॉवर ट्रान्सफॉर्मर उभारण्याचा DPR प्रस्तावित करण्यात आला आहे. यामुळे दिघी परिसरातील औद्योगिक व निवासी ग्राहकांना अखंड आणि दर्जेदार वीजपुरवठा मिळणार आहे.

### औद्योगिक विकासाला चालना

» कॅनबे आणि कळस येथील दोन्ही प्रकल्पांमुळे तळवडे–दिघी औद्योगिक पट्ट्यातील वीज व्यवस्था अधिक सक्षम होऊन नवीन उद्योग, आय.टी. पार्क व गुंतवणुकीस चालना मिळणार आहे. तसेच वारंवार होणारे बिघाड, भारनियमन व महसूल नुकसान लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तळवडे परिसरातील विद्यमान पायाभूत सुविधा त्यांच्या कमाल क्षमतेवर कार्यरत असून भविष्यातील औद्योगिक भारवाढ लक्षात घेता 22/22 के.व्ही. कॅनबे उपकेंद्राची उभारणी अत्यावश्यक ठरली आहे. या उपकेंद्रामुळे औद्योगिक ग्राहकांना विश्वासार्ह, सुरळीत व दर्जेदार वीज पुरवठा उपलब्ध होणार आहे.

# ढोल-ताशांच्या गजरात पुणे ग्रॅण्ड टूरला सुरुवात

## आंतरराष्ट्रीय सायकलपटूंचे पुण्यात जल्लोषात स्वागत

**पुणे | प्रतिनिधी**

ढोल-ताशांचा गजर, मराठी-बॉलिवूडच्या गाण्यांवर थिरकलेली तरुणाई, टाईम ट्रायलसाठी ट्रॅक रिकामा करण्यासाठी सुरू असलेली अधिकाऱ्यांची लगबग, सायकल सज्ज करून ट्रॅकवर उतरण्यासाठी तयार झालेले जगभरातील सायकलपटू अशा उत्साही वातावरणात सोमवारी पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावर 'पुणे ग्रॅण्ड टूर'ला सुरुवात झाली. पहिल्या दिवशी ७.५ किलोमीटरच्या टाईम ट्रायलला पुणेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.




जगभरातील ३५ देशांतील २८ नामवंत संघांचे १६४ आंतरराष्ट्रीय सायकलपटू या स्पर्धेत सहभागी झाले असून, सह्याद्रीच्या घाटरस्त्यांवरून सुमारे ४३७ किलोमीटरचा आव्हानात्मक प्रवास करत विजेतेपदासाठी प्रयत्न करणार आहेत.

सायकलकलींचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याने पुणे ग्रॅण्ड टूरबद्दल प्रचंड उत्सुकता होती. टूर दी फ्रान्सच्या धर्तीवर होणाऱ्या या शर्यतीच्या टाईम ट्रायलला सोमवारी दुपारी १:३० वाजता सुरुवात झाली. शहरातील नामदार गोपाळकृष्ण गोखले चौक येथे पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी पहिल्या स्पर्धकाला हिरवा झेंडा दाखवत अधिकृत सुरुवात केली.

यावेळी, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, राज्य क्रीडा व युवक कल्याण आयुक्त शीतल तेली-उगले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील उपस्थित होते.

या प्रोलॉग रेसमध्ये स्पर्धकांनी वैयक्तिक स्वरूपात एकामागोमाग एक मिनिटाच्या अंतराने सुरुवात केली. ही मुख्य स्पर्धा नसून प्रत्येक सायकलपटूची वैयक्तिक वेळ निर्णायक ठरणार आहे. पुणेकर नागरिकांनी शहरातील मध्यवर्ती रस्त्यांवरून जाणाऱ्या सायकलपटूंचे उत्साहात स्वागत केले. पुढील चार दिवस सह्याद्रीच्या घाट रस्त्यावर रंगणारी चुरस अधिक उत्कंठावर्धक ठरणार आहे.

### पुणेकरांच्या प्रेमामुळे भारावले खेळाडू

» जागतिक खेळाडूंना पुणेकरांच्या आदरातिथ्यासोबत उत्साह आणि क्रीडाप्रेमींचा परिचय देत नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. मोबाइलवर खेळाडूंचे छायाचित्र घेण्यासाठी युवकांमध्ये चढाओढ होती. पुणेकरांचा हा प्रेमळ प्रतिसाद पाहून अनेक खेळाडूंनी हात हलवून अभिवादन स्वीकारले.

### 'मस्कॉट' ठरले आकर्षण

» पुणे ग्रँड टूरचे रंगीत बोधचिन्ह आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले. मस्कॉटसोबत सेल्फी घेण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. यानिमित्ताने महाराष्ट्राचे 'शेकरू' आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचले. निसर्ग आणि खेळ यांच्यातील नाते सांगणाऱ्या 'इंदू' मस्कॉटने टाईम ट्रायलमध्ये आनंदरंग भरले. सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यातून वावरणारा शेकरू सायकलपटूंच्या स्वागतासाठी सज्ज असल्याचा संदेश त्याने दिला.

**ट्रॅकवर कुत्र्याची घुसखोरी**

टाईम ट्रायल सुरू असताना प्रमुख पाहुण्यांच्या समोर अचानक भटके कुत्रे ट्रॅकवर घुसल्याने काही वेळ गोंधळ झाला पण स्वयंसेवकांनी कुत्र्याला बाहेर काढल्याने कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

**स्क्रीन नसल्याने चाहत्यांची गैरसोय**

शर्यत संपते त्याठिकाणी सुरुवातीच्या ठिकाणाची क्षणचित्रे दाखविण्यासाठी कोणतीही स्क्रीन न लावल्यामुळे सायकल चाहत्यांची गैरसोय झाली. तसेच, शर्यत सुरू होत असलेल्या ठिकाणीही स्क्रीनची व्यवस्था करण्यात आली नव्हती

# पीएमआरडीएकडून घरबसल्या 29 सेवा उपलब्ध

## 800 गावांतील नागरिकांना थेट लाभ; वेळ, श्रम आणि खर्चाची बचत

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) नागरिकांना अधिकाधिक सेवा ऑनलाइन देण्यावर भर दिला आहे. त्यानुसार विविध दाखले, परवानग्या आणि प्रमाणपत्रांसाठी आता नागरिकांना कार्यालयांचे हेलपाटे मारण्याची गरज उरलेली नाही.




महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमानुसार प्रशासनाने २९ महत्त्वाच्या सेवा पूर्णपणे ऑनलाइन केल्या असून, आता या सेवांसाठी कोणताही ऑफलाइन अर्ज स्वीकारला जाणार नाही, असे परिपत्रक प्राधिकरणाचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी जारी केले आहे.

प्राधिकरणाचा विस्तार खूप मोठा आहे. प्राधिकरणाच्या हद्दीत सुमारे 800 गावांचा समावेश होतो. प्राधिकरणाचे कार्यालय हे आकुर्डी येथे आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना कोणत्याही कामकाजासाठी या कार्यालयात अर्ज करावा लागत होता. त्यामुळे नागरिकांना अर्ज करण्यासाठी आणि त्यानंतर दाखले घेण्यासाठी यावे लागत होते.

या सर्व पार्श्वभूमीवर अधिकाधिक सेवा नागरिकांना घरपोच कशा देता येतील, यासाठी प्राधिकरणाने ऑनलाइन सेवा देण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार दाखले, प्रमाणपत्र अशा एकूण 29 सेवा ऑनलाइन उपलब्ध करून दिल्या आहेत.

या निर्णयामुळे पीएमआरडीएच्या कामकाजात सुसूत्रता, वेग आणि पारदर्शकता येणार आहे.

घरबसल्या सेवा उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांचा वेळ आणि श्रम वाचणार आहेत. लोकसेवा हक्क कायद्याच्या चौकटीत या सेवा येत असल्याने ठराविक कालमर्यादेत सेवा देणे प्रशासनासाठी बंधनकारक झाले आहे. ज्यामुळे प्रलंबित प्रकरणांचा निपटारा लवकरात लवकर होण्यास मदत होणार आहे.

### या सेवा मिळणार ऑनलाइन

» तात्पुरती रेखांकन परवानगी, जोते प्रमाणपत्र, नूतनीकरण परवानगी, झोन दाखला, भाग नकाशा, आकाशचिन्ह परवाना, अग्निशमन परवाना, पर्यावरण प्रमाणपत्र, जमीन व मालमत्ता विभागाशी संबंधित सदनिका किंवा भूखंडांचे हस्तांतरण, वारस नोंद, कर्जासाठी लागणारे ना-हरकत प्रमाणपत्र आणि भूखंडांची फेरमोजणी आदी सेवा या ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सेवांचा लाभ घेण्यासाठी पीएमआरडीएच्या संकेतस्थळावर नागरिकांना अर्ज करावा लागणार आहे.

# हवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा

## पुणे ग्रँड चॅलेंज टूर स्पर्धेमुळे शहरातील प्रदूषण पातळी घसरली

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे हे सायकलींचे शहर ही ओळख पुसल्याला काळ लोटला; परंतु पुणे ग्रँड चॅलेंज टूरच्या माध्यमातून पुन्हा एकदा तो जुना माहौल शहराच्या काही भागात एक दिवसासाठी का होईना तयार झाला. या टूरमुळे पुण्याच्या प्रदूषणाची पातळी घसरली. यामुळे ‘सायकलींचे शहर’ असताना पुण्याचे हवामान किती शुद्ध असेल, याची झलक यानिमित्ताने पुणेकरांनी अनुभवली.

शहरात ‘पुणे ग्रँड चॅलेंज टूर’ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याने, पुणे शहर वाहतूक पोलिसांनी जाहीर केलेल्या प्रमुख वाहतूक बदलांमुळे दिवसभर शहरातील अनेक महत्त्वाचे रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवले होते. या निर्बंधांमुळे पुण्यातील हवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे (सीपीसीबी) व्यवस्थापित ‘समीर’ ॲपच्या आकडेवारीनुसार, स्पर्धेच्या दिवशी पुण्यातील वायू गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) ९४ नोंदवला गेला. कारण नोव्हेंबर २०२५ पासून एक्यूआय पातळी सातत्याने १५० च्या वर राहिली आहे.

शिवाजीनगर येथील निरीक्षण केंद्रावर, जिथे एक्यूआय पातळी अनेकदा २०० पेक्षा जास्त नोंदवली जाते, तिथे लक्षणीय सुधारणा दिसून आली, एक्यूआय ७९ पर्यंत खाली आला. यामुळे वाहनांची वाहतूक कमी झाल्यावर प्रदूषण कमी होते, हे अधोरेखित होते.

या स्पर्धेदरम्यान प्रशासनाने अनेक महापालिका प्रभागांमधील शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली होती. याव्यतिरिक्त, पर्यावरण विभागानेही अनेक पावले उचलली, ज्यामुळे शहराच्या हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झाली.



> “ शहरातील हवेची गुणवत्ता समाधानकारक पातळीवर आल्याचे पाहून आनंद होत आहे. काही दिवसांपूर्वी आम्ही अतिरिक्त आयुक्तांसोबत वायू प्रदूषणाच्या मुद्द्यावर बैठक घेतली होती. त्यानंतर आम्ही फॉगर वाहनांच्या वेळेत बदल केला, जी पूर्वी दुपारच्या वेळी शहरात फिरत होती. आता ही वाहने पहाटेपासूनच प्रमुख रस्त्यांवर फिरत आहेत. आम्ही शहरातील वायू प्रदूषणासाठी जबाबदार असलेल्या क्षेत्रनिहाय घटकांवरही लक्ष देत आहोत.
>
> **- किशोरी शिंदे, पर्यावरण अधिकारी, पुणे महापालिका.**

---

# पुणे महापालिकेचे 2026-27 चे अंदाजपत्रक 30 जानेवारीपर्यंत

## निवडणूक प्रक्रियेमुळे विलंब; सुमारे 1,500 कोटींच्या अंदाजपत्रकात मूलभूत सुविधांना प्राधान्य

**पुणे | प्रतिनिधी**

नवनिर्वाचित नगरसेवकांचा समावेश असलेले महापालिकेचे सभागृह लवकरच अस्तित्वात येणार असून, महापालिकेच्या 2026-27 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक येत्या 30 जानेवारीपर्यंत सादर करण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिली. आगामी अंदाजपत्रकात रस्त्यांची दुरुस्ती व नवीन रस्त्यांचा विकास, स्वच्छता आणि पाणीपुरवठा या कामांना प्राधान्य दिले जाणार आहे.




महापालिकेचे अंदाजपत्रक सर्वप्रथम आयुक्तांकडून तयार करण्यात येते. यामध्ये मागील आर्थिक वर्षाच्या डिसेंबरअखेरपर्यंतचे प्रत्यक्ष उत्पन्न, पुढील तीन महिन्यांत म्हणजे मार्चअखेरपर्यंत अपेक्षित उत्पन्न, तसेच शासनाकडून मिळणारा निधी यांचा समावेश असतो. नियमानुसार साधारणतः 20 जानेवारीपूर्वी आयुक्तांनी अंदाजपत्रक सादर करणे अपेक्षित असते. त्यानंतर स्थायी समितीकडे हे अंदाजपत्रक सादर करण्यात येते आणि स्थायी समिती अंतिम निर्णय घेऊन ते सर्वसाधारण सभेच्या मंजुरीसाठी सादर करते. मात्र, यंदा 15 डिसेंबरपासून सुरू झालेल्या निवडणूक प्रक्रियेमुळे तसेच त्यापूर्वी प्रभाग रचना आणि मतदार याद्यांच्या कामामुळे अंदाजपत्रक विहीत मुदतीत सादर करणे शक्य झाले नाही.

### अनुदानाचाही अंदाजपत्रकात समावेश असणार

» महापालिकेचे आगामी अंदाजपत्रक सुमारे 1 हजार 500 कोटी रुपयांचे असण्याची शक्यता असून, शासनाकडून समाविष्ट गावांसाठी मिळणारा सुमारे 2 हजार कोटी रुपयांचा जीएसटी, मुद्रांक शुल्क अधिभार तसेच विविध योजनांमधील अनुदानाचाही या अंदाजपत्रकात समावेश असणार असल्याची माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

यासंदर्भात आयुक्त नवल किशोर राम यांनी सांगितले की, निवडणुकीमुळे अंदाजपत्रकाला अंतिम स्वरूप देता आले नाही. मात्र, येत्या 30 जानेवारीपर्यंत अंदाजपत्रक सादर केले जाईल. सायकल स्पर्धेच्या निमित्ताने शहरातील काही रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आली असून, सुमारे दोन हजार चेंबर्स समपातळीत करण्यात आले आहेत.

पुढील वर्षभरात शहरातील सर्व रस्त्यांची दुरुस्ती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच सुमारे 40 हजार चेंबर्स समपातळीत करण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. काही ठिकाणी पावसाळी गटारांचे चेंबर्स समपातळीत करण्याला प्राधान्य दिले जाईल. शहर स्वच्छ ठेवणे आणि सर्व कचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प कार्यान्वित करणे, हेही प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे.